IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# आत्मनिर्भर भारत योजना आणि जागतिकीकरण

प्रा. डॉ. प्रभाकर गणपत गावंड
इतिहास विभाग प्रमुख
सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर जि. रायगड.
pggawand@gmail.com

गोषवारा –

आत्मनिर्भर भारत ही नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेली एक योजना आहे. कोरोनाच्या कालखंडात संपूर्ण जग थांबलेले असताना प्रत्येक देशाच्या मूलभूत गरजा या त्याच देशात भागविल्या गेल्या पाहिजेत या भावनेतून ही योजना निर्माण झालेली आहे. या योजनेचा मूळ उद्देश भारत हा स्वावलंबी बनून भारतातल्या नागरिकांच्या सर्व गरजा शक्यतो भारतातच भाग्यविला गेल्या पाहिजेत.

याचा अर्थ भारतातल्या नागरिकांनीच या गरजा भागवण्यासाठीचे उत्पादन भारतातच केले पाहिजे. म्हणजेच स्वदेशी वस्तू निर्माण करून त्या भारतातच विकल्या गेल्या पाहिजेत. मात्र असे करताना आपण आत्मकेंद्री न बनता जगाच्या प्रवाहाबरोबर राहिले पाहिजे. जागतिकीकरणाचा भारताने याआधीच स्वीकार केलेला असताना आत्मनिर्भर भारत योजनेच्या निर्मितीमुळे जागतिकीकरणाला कुठेही बाधा येऊ न देता ही योजना अमलात आणली पाहिजे.

भारतीय बनावटीच्या वस्तू या भारतात विकल्या जाऊन त्या इतर देशांना देखील पुरविल्या गेल्या पाहिजेत. मात्र भारतामध्ये इतर देशांकडून कमीत कमी आयात झाली पाहिजे, यासाठीच ही योजना राबविण्यात आली आहे. या योजनेचे अत्यंत सकारात्मक परिस्थिती परिणाम गेल्या तीन-चार वर्षांमध्ये दिसून येत आहेत ही या योजनेची फलश्रुतीच मानावी लागेल.एकूणच "आत्मनिर्भर भारत" योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेली ही योजना भारतासाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे

की वर्ड - आत्मनिर्भर, अर्थव्यवस्था, स्वावलंबी

प्रस्तावना –

२०२० च्या मार्च महिन्यात जगामध्ये कोरोना नावाच्या महामारीने हाहाकार माजवला. अगदी अकल्पित असलेल्या या रोगाने संपूर्ण जगाला अक्षरशः वेठीस धरले होते. लॉकडाऊन सारख्या उपायांनी या रोगाला प्रतिबंध घालण्याचा सर्वच देशांनी प्रयत्न केला. भारत देश देखील याला अपवाद नव्हता. २५ मार्च २०२० पासून लॉकडाऊन च्या माध्यमातून देशातील सर्वच व्यवहार ठप्प पडले होते. दीड-दोन वर्षाच्या कालावधीनंतर हळूहळू देशातील जनजीवन

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

पूर्वपदावर येऊ लागले. आधीच संकटात असलेली देशाची अर्थव्यवस्था या महामारीमुळे मात्र आणखीनच संकटात सापडली होती.

कोरोना काळात जास्तीत जास्त लोकांना घरातच बसण्याचा आग्रह धरण्यात आला होता. साहजिकच सर्व प्रकारचे व्यवसाय ठप्प पडले होते. अनेकांनी आपल्या नोकऱ्या गमावल्या. अनेक कंपन्यांनी वर्क फ्रॉम होमही संकल्पना राबवून आपल्या कर्मचाऱ्यांना घरातून काम करण्यास सांगितले. या सर्व घटनाक्रमातून दोन वर्षात लाखो कर्मचारी आपल्या नोकऱ्या गमावून बसले.

अशा परिस्थितीत नरेंद्र मोदी सरकारने योग्य पावले टाकून भारताची अर्थव्यवस्था सावरण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्याचाच एक भाग म्हणजे आत्मनिर्भर भारत योजनाहोय.

➢ आत्मनिर्भर या संकल्पनेचा अर्थ -

आत्मनिर्भर हा हिंदी भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ स्वावलंबी किंवा इतरांवर अवलंबून नाही असा होतो.

म्हणजेच ढोबळ मानाने आत्मनिर्भर या संकल्पनेचा अर्थ हा स्वयंपूर्ण किंवा स्वतःच्या गरजा स्वतः भागवणे असा होतो. मात्र आत्मनिर्भर म्हणजे आत्मकेंद्रित नव्हे. व्यापक अर्थाने पाहिल्यास आत्मनिर्भर म्हणजे जिथे जिथे आपण इतर देशांवर अवलंबून आहोत मग ते आयातीसाठी असो किंवा परदेशी गुंतवणुकीसाठी असो किंवा त्याच्यावर अवलंबून असतानाही आपण आपले उद्योग आपल्या सेवा अधिकाधिक कार्यक्षम आणि जागतिक दर्जाच्या करणं हे होय.

आज जगात असा एकही देश आढळणार नाही याची आर्थिक समृद्धी आणि श्रीमंती ही फक्त त्याच देशातील उद्योगांना विकसित करून झाली आहे- सद्यस्थितीत हेच धोरण योग्य आहे मोदी सरकारने त्यासाठी आणलेली ही योजना उपयुक्त आहे.पण सरकारचे हे धोरण दीर्घकालीन असू नये.

भारतीय संस्कृतीचा विचार केल्यास आपणास असे दिसून येते की प्राचीन काळापासून भारत हा स्वयंपूर्ण किंवा स्वावलंबी देश होता भारतातील प्रत्येक खेड्यामध्ये लोकांच्या गरजा भागवल्या जात होत्या म्हणजेच स्वावलंबी खेड्याची संकल्पना आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये दिसून येते. कोरोना सारख्या संकट काळात आपण आपले कुटुंब टिकून ठेवताना देशासाठी देखील मौलिक योगदान देऊ शकतो ही या योजनेची फलश्रुती म्हणता येईल.

➢ आत्मनिर्भर भारत योजनेचे स्वरूप

आत्मनिर्भर भारत योजना भारत सरकारचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. त्यामुळे भारत हे आत्मनिर्भर राष्ट्र बनण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली एक योजना आहे. कोरोना काळात १३ मे २०२० रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही योजना जाहीर केली होती. जर प्रत्येक भारतीयांनी स्वदेशी उत्पादने वापरण्याचे ठरवले तर चार ते पाच वर्षात भारत हा आत्मनिर्भर देश होऊ शकेल असा विश्वास नरेंद्र मोदी यांना वाटत होता-

➢ आत्मनिर्भर भारत योजनेची उद्दिष्टे -

१) भारतीय अर्थव्यवस्थेचे आत्मनिर्भरीकरण करणे.

२) भारतीय देशी उद्योगांना सशक्त करणे

३) भारतातील रोजगार निर्मितीत वाढ करणे.

४) भारतातील तंत्रज्ञानाचा विकास करणे

➢ आत्मनिर्भर भारत योजनेची वैशिष्ट्ये -

१) आत्मनिर्भर भारतीय ही योजना पाच प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करते ती खालील प्रमाणे

अ) भारतीय अर्थव्यवस्था -

ही जगातील एक मोठी अर्थव्यवस्था आहे. मात्र तिचा वृद्धीदर हा दोन टक्क्यांनी कमी आहे उत्पादनक्षमता चांगली असतानाही ती चीनच्या तोडीची नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर लक्ष केंद्रित करून भारतीय अर्थव्यवस्थेला मजबूत करण्यासाठी या योजनेतून प्रयत्न आहे.

ब) पायाभूत सुविधा -

आज चीन हा देश उद्योग आणि उत्पादनाच्या स्पर्धेत आघाडीवर आहे त्याच्याशी स्पर्धा करण्यासाठी किंवा चीनमध्ये असलेल्या परदेशी कंपन्यांना भारताकडे आकर्षित करण्यासाठी भारताला जागतिक स्तरावरील उत्तम पायाभूत सुविधा उभारणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन जमीन पाणी वीजपुरवठा यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न आहे. यासारख्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुरेसा वेळ गरजेचा आहे.

क) यंत्रणा -

भारताच्या पंतप्रधानांनी तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करण्याचा सल्ला दिलेला आहे सरकारने याबाबत सकारात्मक पावले उचलून विविध यंत्रणांना याबाबत निर्देश दिले आहेत सरकारच्या प्रयत्नांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळण्यास मदत होते.

ड) सशक्त मनुष्यबळ आणि सक्रिय लोकसंख्या -

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी६५ टक्के लोकसंख्या ही ३५वर्षांच्या खालील आहे ही भारतासाठी जमिनीची बाजू आहे म्हणजेच भारताच्या प्रगतीचा सुकाणू खऱ्या अर्थाने तरुणाईच्या हाती आहे. आज भारताची लोकसंख्या ही १४० कोटींच्या वर पोहोचलेली असली तरी तरुण मनुष्यबळाच्या आधारे देशाचा आर्थिक विकास शक्य असल्याचे आत्मनिर्भर भारत योजनेच्या माध्यमातून निदर्शनास येते.

इ)मागणी आणि पुरवठा -

भारत ही एक मोठी बाजार जागतिक बाजारपेठ आहे. यामुळे या बाजारपेठेकडे अनेक गुंतवणूकदार आकर्षित होऊ शकतील. कोरोना काळात मागणी कमी होऊन बाजारपेठेवर विपरीत परिणाम झाले होते. मात्र कोरोना नंतर मागणी वाढू लागली आणि पुन्हा बाजारपेठ यांनी उत्कर्ष गाठला सूक्ष्म आणि लघु उद्योगांना सरकारकडून अर्थसहाय्य देण्यात आले.

आजकाल चीन या देशाने जगातील अनेक बाजारपेठांवर आपले वर्चस्व निर्माण केले असले तरी जगातील अमेरिकेसारख्या अनेक बडे देश चीनवर नाराज आहेत. चीनमधील गुंतवणूक मागे घेण्याचा ते विचार करीत आहेत अशावेळी भारतालाही उत्तम संधी आहे.

२) ही योजना विविध प्रकारची संसाधने व प्रोत्साहन यांच्या साह्याने भारताला आत्मनिर्भर करण्यास मदत करते.

३) ही योजना भारतातील सरकारी व खाजगी संस्था किंवा व्यक्ती अशा सर्व घटकांसाठी खुली आहे.

आत्मनिर्भर भारत योजनेमुळे जागतिकीकरणाचा अंत होणार अशा प्रकारची चर्चा संपूर्ण देशभरात घडत होती- मात्र तसे काही झाले नाही. नरेंद्र मोदी यांनी कोरोना काळात भारतीय नागरिकांना ‘स्वदेशी उत्पादने विकत घ्या असे आवाहन केले. जेणेकरून भारतीय कंपन्यांनापरदेशी कंपन्यांना तोंड देता येईल. अर्थतज्ञांनी याबाबत असे मत व्यक्त केले की स्वावलंबन ही एक चांगली बाब आहे,परंतु याचा अर्थ आपण विदेशी वस्तुंची आयात बंद करू किंवाआंतरराष्ट्रीय व्यापारासाठी भिंती उभ्या करू असा नव्हे.

लोकांना विदेशी वस्तु घ्यायला सांगणे एका दृष्टीने व्यवहार्य ठरणार नाही.कारण वस्तूंची गुणवत्ता आणि किंमत या देखील महत्वाच्या बाबी आहेत. त्यामुळे आयातीला पर्याय म्हणून आत्मनिर्भर भारत योजना आहे असे नव्हे. भारताच्या अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आत्मनिर्भर भारत योजनबाबत बोलताना स्पष्ट केले की,आपण आपली संसाधने एकत्र करणार परंतु भारताला जगापासून तोडणार नाही.

कोणत्याही देशाच्या स्वतःच्या गरजा भागविल्या तर तो देश निर्यात करू शकेल. निर्यातीच्या आघाडीवर भारताची वाटचाल ही आपणास समजून घ्यावे लागेल. वास्तविक पाहता कोणताही देश आत्मनिर्भर किंवा स्वावलंबी होणे ही त्या देशाच्या विकासाची निरंतर प्रक्रिया असते. स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षात भारताने ऑटोमोबाईल क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. त्यामध्ये स्कूटर,मोटरसायकल,कार,अवजड वाहने,ट्रॅक्टरप्रवासी बस,रेल्वे इंजिन व रेल्वेचे डबे,पोलाद,सिमेंट,शेती उद्योगातील संकरित बी- बियाणे,कीटकनाशके,खते,रसायने,विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उपग्रह] संगणक,मोबाईल,दूरसंचार सेवा,चित्रपट निर्मिती,माहिती आणि तंत्रज्ञान,यासारख्या अनेक क्षेत्रात भारत हा नक्कीच आत्मनिर्भर झालेला दिसून येतो.

सैन्य दलामध्ये तेजस लढाऊ विमाने,चेतक हेलिकॉप्टर,रडार यंत्रणा] शक्तिमान ट्रक,दूर अंतरावरून मारा करणारी क्षेपणास्त्रे,यामध्ये देखील स्वातंत्र्यानंतर भरीव अशी प्रगती झालेली दिसून येते. मात्र अजूनही काही क्षेत्रांमध्ये भारताला आत्मनिर्भर होण्याची गरज आहे हेही तितकेच खरे आहे. मात्र तरीही जगातील कोणताही देश शंभर टक्के आत्मनिर्भर किंवा स्वावलंबी असू शकत नाही.

आज भारताला खनिज तेल,सोने,अत्याधुनिक लष्करी साहित्य,विमानवाहू युद्धनौका,अत्याधुनिक लढाऊ विमाने,अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी,विविध प्रकारची रसायने,इलेक्ट्रॉनिक सुट्टे भाग इत्यादी वस्तूंची आयात करावी लागते. त्यामुळे या क्षेत्रात ही भविष्यात आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. मात्र त्यासाठीच्या मर्यादा देखील आपण समजून घेतल्या पाहिजेत.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

आपल्या देशात खनिज तेलाचे साठे कमी असल्यामुळे जवळपास ८० टक्के खनिज तेलाची आपणास आयात करावी लागते आणि त्यातून रॉकेल,पेट्रोल,डिझेल तयार करतो. भारतात सोन्याच्या खाणी आहेत- मात्र त्याचे उत्पादन अत्यल्प आहे आणि भारतीयांचा कल हा मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने वापरण्याकडे आहे. त्यामुळे जगातील इतर देशांमधून आपल्याला सोन्याची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागते.

याचाच अर्थ आपली इच्छा असून देखील काही क्षेत्रात आपण आत्मनिर्भर होऊ शकत नाही. त्याचबरोबर सरसकट विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकून चालणार नाही. कारण आपण निर्यात करीत असलेल्या वस्तूंवर ही इतर देश बहिष्कार टाकू शकतात,याचीही आपल्याला जाणीव आहे.

निष्कर्ष -

आपण आपली नैसर्गिक संसाधने आणि कच्चामाल यांच्या आधारे अनेक गरजेच्या वस्तूंचे उत्पादन करू शकतो आणि जवळच्या बाजारपेठांमध्ये त्याची विक्री करू शकतो याद्वारे तुम्ही स्वावलंबी म्हणजेच आत्मनिर्भर भारताच्या मार्गात महत्वपूर्ण योगदान देऊ शकता तसेच आत्मनिर्भर भारत निर्माण स्वप्न बळकट करण्यासाठी इतरांना मदत करू शकता.

संदर्भ -

1. दैनिक सकाळ दिनांक १८ जून २०२०
2. बीबीसी मराठी वृत्तसेवा दिनांक १५ ऑगस्ट २०२०
3. केंद्रीय संरक्षण मंत्री श्री राजनाथ सिंह यांनी दिल्लीमध्ये केलेल्या भाषणाचाप्रकाशित भाग
4. लोकसत्ता बिझनेस न्युज डेस्क दि.३१ऑगस्ट२०२३
5. अर्थपूर्ण मासिक, अर्थक्रांती प्रकाशन पुणे, नोव्हेंबर २०२०
6. विकिपीडिया माहिती स्त्रोत

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in